# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दाखल तारीख : १४/०२/२०२४
लोकपाल कार्यालय : ०४/०३/२०२४
निकाल तारीख : २६/०३/२०२४

**लोकपाल श्री. श्रीकृष्ण भ. पानसे**
(निवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश)
निकाल दिनांक २६/०३/२०२४

अपील क्र. ०१/२०२४

श्री. अजित रामदास मिसाळ
फ्लॅट नं. ७०१, ए–११ मंगलभैरव, नांदेड सिटी, तक्रारदार/अर्जदार
पुणे ४११ ०४१
मोबाईल नंबर – ९६०४८८४००७

विरूद्ध

विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष जाब देणार
निकाल दिनांक १४/०२/२०२४

१) विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाने (सोयीसाठी यापुढे विद्यापीठ असा उल्लेख केला आहे.) श्री. अजित रामदास मिसाळ, व्यथित विद्यार्थी (याचा पुढे उल्लेख मिसाळ असा केला आहे.) यांनी केलेल्या तक्रारीविरूद्धचा निकाल दिनांक १४/०२/२०२४ रोजी दिला. या निकालावर नाराज होऊन मिसाळ यांनी ही तक्रार लोकपाल यांच्याकडे दिनांक २१/०२/२०२४ रोजी केली, असे विद्यार्थी विकास मंडळाच्या शिक्यावरून त्यांनी ती लोकपालकडे तारीख निश्चितीसाठी ०४/०३/२०२४ रोजी पाठवली. लोकपालानी सुनावणीची तारीख १८/०३/२०२४ रोजी निश्चित केली.

२)    मिसाळ यांच्या तर्फे ते स्वतः, जाब देणार यांच्या तर्फे डॉ. कुलकर्णी यांनी दिनांक १८/०३/२०२४ रोजी युक्तिवाद केला.

३)    अपिलात श्री मिसाळ विद्यापीठाचा आदेश अन्ययाकारक आहे, असे म्हणतात तो खालीलप्रमाणे आहे, त्यांचा दिनांक १४/०२/२०२४ असा आहे.

''वरील संदर्भात विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाने खालीलप्रमाणे आदेशित केले आहे.

१.  महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ५६ (२)(ख) नुसार विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी आणि अशा तक्रारी कमी करण्यासाठी आणि त्यास अटकाव करण्यासाठी महाविद्यालयाने महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजविषयक कार्यकारी यंत्रणा व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

२.  महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातील तसेच शासन व विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयाच्या कोणत्याही पाठ्यक्रमांसाठीची किंवा अध्ययनक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू होण्याच्या दिनांकापूर्वी किमान साठ दिवस संपण्या अगोदर, महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींच्या व सर्वसाधारण जनतेच्या माहितीसाठी पाठ्यक्रमांसाठीची किंवा अध्ययनक्रमांसाठीच्या प्रवेशा संदर्भातील प्रशासकीय/शैक्षणिक कामकाजाविषयक असलेल्या नियमांबाबतची अचूक सविस्तर माहिती, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हतेच्या व पात्रतेच्या शर्ती तसेच प्रवेशा संदर्भातील महत्त्वाचे दिनांक नमूद करून पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी विहित कालावधीत महाविद्यालयाच्या माहितीपुस्तिकेत प्रसिद्ध करावी आणि महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर टाकावी.

३.  सदर प्रकरणाच्या अनुषंगाने सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे यांनी श्री. अजित रामदास मिसाळ (तक्रारदार/अर्जदार) या विद्यार्थ्यांस योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने पुढील शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करिता विद्यार्थ्यांस विश्वासात घेऊन त्याच्या ऐच्छिक विषयाकरिता प्रवेशाची संधी देण्यात यावी, या बाबतची कार्यवाही प्राधान्याने करावी.

४.  प्रवेश संदर्भातील ही कार्यवाही महाविद्यालयस्तरावर पूर्ण करावी.''

४)   मिसाळ यांचा अर्ज व युक्तिवाद याआधारे जे मुदे उपस्थित केले ते मुदे म्हणजे १. आदेशात प्रवेशा संबंधी स्पष्टता नाही. २. एक शैक्षणिक वर्ष वाया जाणार. ३. भेदभाव करून प्रवेश नाकारला. ४. सर्व तक्रारी एकत्रितरित्या निकाली काढल्या. ५. शिक्षणाचा मूलभूत अधिकार असून त्यांच्या पासून वंचित केले. ६. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ५६  उल्लंघन केले.

५) विद्यापीठ निकालात क्र. ६ मध्ये म्हटल्याप्रमाणे प्रभारी प्राचार्य स. प. महाविद्यालय यांनी दिनांक २१/०२/२०२४ रोजी या संदर्भात अहवाल पाठवला तो असा

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ५६ (२)(ख) नुसार विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण कक्ष आहे. महाविद्यालयात तक्रार निवारण कक्षाच्या कार्यकारी यंत्रणे मार्फत कामकाजाविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल.

२. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी किमान ६० दिवस अगोदर महाविद्यालयाच्या माहितीपुस्तिकेत प्रवेशा संदर्भातील प्रशासकीय/शैक्षणिक कामकाजाविषयक असलेल्या नियमांबाबतची अचूक सविस्तर माहिती, शैक्षणिक अर्हतेच्या व पात्रतेच्या शर्ती, प्रवेशा संदर्भातील महत्वाचे दिनांक नमूद करून महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३. श्री. अजित रामदास मिसाळ (तक्रारदार/अर्जदार) या विद्यार्थ्यांस योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने पुढील शैक्षणिक वर्षांच्या २०२४–२५ प्रवेशाकरिता त्यास विश्वासात घेऊन त्यांच्या ऐच्छिक विषयाकरिता प्रवेशाची संधी गुणवत्तेनुसार देण्यात येईल.

४. प्रवेशा संदर्भातील ही कार्यवाही महाविद्यालय स्तरावर पूर्ण करण्यात येईल.

५. अशा प्रकरणांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महाविद्यालयाकडून योग्य ती काळजी घेतली जाईल व महाविद्यालय स्तरावर प्रवेश समिती व तक्रार निवारण समिती योग्य ती उपाययोजना करतील.

६) दिनांक १४/१०/२०२४ रोजी मिसाळ यांनी स.प.महाविद्यालय यांच्या विरुद्ध असा स्वरूपाचा अर्ज विद्यार्थी विकास मंडळाकडे केला होता. त्यासंदर्भात दिनांक २१/१२/२०२३ ला महाविद्यालयाने उत्तर देउन असे म्हटले की, प्रवेश प्रक्रिया प्रचलित नियमानुसार झाली असून तक्रारीत कोणतेही तथ्य नाही.

७) विद्यापीठातर्फे असे सांगण्यात आली की, मिसाळ यांचा अर्ज त्यांच्या कक्षाकडे दिनांक २८/१२/२०२३ रोजी आला त्यानंतर १२/०१/२०२४ रोजी स.प.महाविद्यालयाकडे पत्र पाठवून अर्जतील गोष्टीविषयक मुद्येसूद स्पष्टीकरण मागितले, हे पत्र पाहिले असता विद्यापीठ यांनी मिसाळ यांच्या अर्जावर सर्व गोष्टी संदर्भात स्प्ष्टीकरण मागितले या पत्रात कोणत्याही उणीवा नाहीत. विद्यापीठाला अपेक्षित असलेले सहकार्य महाविद्यालयांच्या संबंधितांकडून न मिळाल्यामुळे मिसाळ यांच्याशी चर्चा करून आणखी १५ दिवसांची मुदत वाढ देऊन प्राचार्यांना तक्रार निवारण करण्यासाठी म्हणून बोलविण्यात आले त्या दिवशी प्राचार्य संबंधित प्राध्यापक आणि इतर सेवकही आले होते.

८) मिसाळ यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या अर्जाचा निपटारा १५ दिवसांत व्हावयास हवा होता तो झाला नाही महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाच्या कार्यकारी यंत्रणेशी) संबंधित एकरूप परिनियम जे आहेत त्यात कलम (४) पाच अन्वये १५ दिवसांच्या आत निपटारा करावायास हवा होता तसेच महाविद्यालयाने नियम (३) पाचप्रमाणे त्यांच्या अर्जाचा निपटारा करावयास हवा होता ही वस्तुस्थिती आहे की, तो तसा झाला नाही. विद्यापीठातर्फे तसे का झाले नाही यांची कारणंमिमांसा देताना कागदपत्रांच्या आधारे स्पष्ट केले की, अर्ज मिळाल्यानंतर विद्यापीठात असलेल्या उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून काम करून घेउन, महाविद्यालयातून आलेले उशीराचे उतर व मिसाळाच्या

संमतीने योग्य उत्तर मिळण्यासाठी दिलेली मुदत याने उशीर झाला हे उत्तर योग्य आहे त्यामुळे विद्यापीठाची काही चूक आहे, असे दिसत नाही. विद्यापीठाने त्यामुळेच महाविद्यालयाने आदेश क्र. १ व २ दिला आहे. त्यात कोणतीही त्रुटी नाही.

९) विद्यापीठाच्या १८/०१/२०२४ च्या पत्रास प्रभारी प्राचार्य स.प. महाविद्यलय यांनी दिलेल्या उत्तरात तक्रार निवारण समितीची नेमणूक केली असे म्हटले त्या संबंधीचे पत्र दिनांक २०/११/२०२३ चे आहे. त्या समितीत १. प्रा. डॉ. गायकवाड, २. डॉ. कोळेकर, सहायक प्राध्यापक व ३. डॉ. मृणाल रिसबूड, सदस्य व विशेष निमंत्रित डॉ. अरविंद काकुळते, विभागप्रमुख मानसशास्त्र, डॉ. रेखा शेरकर विभागप्रमुख तत्वज्ञान, असे असल्याचे कळविले. त्यांनी बोलविलेल्या सभेचा वृतांत ही दाखल आहे.

१०) तत्वज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. रेखा शेरकर यांनी मिसाळ यांना २०२३–२४ प्रवेश का देण्यात आला नाही याचा मुद्देसुद खुलासा ०४/१०/२०२३ ला दिलेला आहे. मिसाळ यांनी त्यांच्या युक्तिवादात/अर्जात जातीभेद करून प्रवेश दिला जातो, असे म्हटले. या खुलाश्यात स्पष्ट शब्दात त्यांनी असे म्हटले आहे की, " आदरणीय सर सामाजिक स्तरावर मी ST प्रवर्गाची प्रतिनिधी त्यामुळे असा सामाजिक भेदभाव होउ देणे माझ्याकडून शक्य नाही त्यांचा हा दावा निखलास खोटा आहे" त्यांनी असेही म्हटले आहे की, चालू शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये प्रवेश प्रक्रिया गुणवतेनुसार राबविण्यात आली ती पूर्ण झाली त्यामुळे मिसाळ यांना प्रवेश देता आला नाही. त्या असेही म्हणतात की, २०२१–२२ या शैक्षणिक वर्षामध्ये त्यांनी अर्ज भरला होता त्यावेळेस त्यांना जागा शिल्लक असल्यामुळे विभागप्रमुख यांनी प्रवेश देउ केला परंतु त्यांनी प्रवेश घेतला नाही.

११) डॉ. शेरकर यांचा खुलासा मिसाळ यांच्या अर्जातील संदर्भ देउन दिला आहे. तो वाचताना खात्री पटते की महाविद्यालयाने योग्य ती काळजी प्रवेश संदर्भात घेतली आहे. त्यांची धारणा कोणावरही सामाजिक भेदभाव होउ नये अशी आहे. मिसाळ यांना शिक्षणापासून वंचित ठेवावे असे दिसत नाही त्यामुळे त्यांच्या मूलभूत अधिकारावर गदा आणली, असे म्हणता येत नाही.

१२) मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. काकुळते यांनी ३/१०/२०२३ व २०/०१/२०२४ रोजी खुलासा देउन स्पष्ट केले आहे की, मानसशास्त्र विभागाने परिपत्रक १८५/२०२३ या पात्रता निकष ठरविण्याच्या पत्राचा उपयोग करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली आहे त्यानुसार फक्त मानसशास्त्र हा विषय (विशेष व सामान्य) स्तरावर असलेल्या मुलांना प्रवेश दिलेला आहे. तसेच इतर विद्यापीठातील अनुदानित प्रवेशासाठी एक खुला व एक राखीव प्रवेश दिला आहे. यासंदर्भात मिसाळ यांच्या युक्तिवादात कोणतेही तथ्य आढळलेले नाही.

१३) महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य यंनी दिनांक ०३–०४/१०/२०२३ रोजी उपकुलसचिव शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) गणेशखिंड, पुणे यांना एक पत्र लिहले हे पत्र मिसाळ यांच्या अर्जांतील खुलाशा संदर्भात होते. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, यापूर्वी मिसाळ यांनी महाविद्यालयात राज्यशास्त्र व समाजशास्त्र पदव्युतर शिक्षण घेतले आहे परंतु समाजशास्त्र या विषयातील द्वितीय वर्षांतील प्रवेश व परीक्षा शुल्क अद्याप त्यांनी भरलेले नाही साहजिक असे शुल्क न भरल्यामुळे मिसाळ यांना दुसऱ्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश कसा देता येतो याचा खुलासा मिसाळ यांनी केला नाही दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, मिसाळ यांच्याकडे महाविद्यालयाचे रू. १० हजार येणे आहे ते दिल्या शिवाय त्यांना कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश देता येणार नाही या संबंधात मिसाळ यांनी कोणताही खुलासा केला नाही.

१४) विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या हुकुमातील परिच्छेद १ व २ यामध्ये जे आदेश आहेत ते अधिनियमाला धरून दिलेले आहेत असे मार्गदर्शन करणे हा त्यांचा अधिकार आहे त्या नियमाला महाविद्यालयाने जे उतर दिलेले आहे त्यात ही काही त्रुटी नाही.

१५) परिपत्रक क्र. ९१/२०२३ दिनांक ३०/०५/२०२३ अन्वये विद्याशाखेचे प्रवेश ३१/१०/२०२३ रोजी संपते शैक्षणिक वर्ष २०२३–२४ शैक्षणिक पात्रता विभागाच्या शै. पा./२२८, दिनांक ०९/१०/२०२३ च्या पत्रानुसार शैक्षणिक पात्रतेची मुदत ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंतची होती. या दोन्ही मुदती मिसाळ यांच्याबाबतीत संपलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादात त्यांना दुसऱ्या सत्रात प्रवेश दयावा जेणेकरून त्याचे शैक्षणिक वर्ष वाचवावे असे त्यांचे म्हणणे आहे ते विद्यापीठाच्या नियमाना धरून होत नाही. मिसाळ यांच्या युक्तिवादात असे आले की त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जात आहे ते जर पात्रतच नव्हते तर असे म्हणणे याला काही अर्थ नाही त्यांनी असेही सांगितले की पूर्वीच्या मा. कुलगुरू यांनी त्यांना असा प्रवेश दिला होता. त्यांची एकटयाची परीक्ष घेण्यात आली तसे अधिकार मा. कुलगुरू यांना असतील परंतु माझ्या पुढे जे प्रकरण आहे त्या प्रकरणातील कागदपत्राच्या आधारे हे सिध्द होते की, नियमानुसार सर्व प्रक्रिया राबविण्यात आली आहे. जो कमी जास्त वेळ गेला तो परिस्थितीमुळे विद्यापीठ किंवा महाविद्यालयास याबाबत दोषी धरता येणार नाही. मिसाळ यांना पुढील शैक्षणिक वर्षात ते पात्र ठरले तर त्यांना प्रवेश दिला जाईल, असे प्राचार्यांनी कळविले आहे.

१६) मिसाळ यांचे असेही म्हणणे आहे की, विद्यापीठाने प्राध्यपकांच्या विलंबासाठी कोणतीही कारवाई केलेली नाही. सकृतदर्शनी असे दिसते की, तसे अधिकार या कक्षाला नाहीत. त्यांनी जे मार्गदर्शन करावयाचे ते त्यांनी केलेले आहे. वरील उहापोहावरून त्यांच्या हातून काही चूक झाली असेही दिसून येत नाही.

१७) विद्यापीठाने त्यांच्या हुकुमाने मिसाळ यांचे सर्व अर्ज निकाली काढले त्या अर्जाचे स्वरूप बघता असे दिसून येते की मिसाळ जेव्हा जेव्हा विद्यापीठात आले तेव्हा तेव्हा ज्या काही घटना घडल्या तेव्हा तेव्हा त्यांनी अर्ज दाखल केला त्या अर्जाचे स्वरूप बघता विद्यापीठाने हुकुम करताना हे निकाली काढले ते योग्य झाले असे दिसून येते. युक्तिवादा वेळी मिसाळ यांनी असे म्हटले की ते एक 'मराठवाडा विद्यार्थी सहाय्य समिति' अशी एनजीओ चालवतात. त्यांनी अनेक अर्ज केलेले आहेत.

१८) वरील सर्व गोष्टीचा विचार करता मी खालीलप्रमाणे हुकुम करत आहे.

हुकुम

मिसाळ अजित रामदास यांनी विद्यापीठाच्या दिनांक १४/०२/२०२४ रोजीच्या हुकुमा विरूध्दचा केलेला अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

स्थळ : पुणे.

26/03/2024

लोकपाल

श्री. श्रीकृष्ण भ. पानसे